| MHBI170007372021 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | : ०६.११.२०२१ |
| | नोंदणी दिनांक | : १०.११.२०२१ |
| | निकाल दिनांक | : १८.०७.२०२६ |
| | कालावधी | : ०४ व ०८ म १२ दि |

| | |
|---|---|
| | <u>**निशाणी क्र.२४**</u> |
| | <u>**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वडवणी यांचे न्यायालय**</u><br>(पिठासीन अधिकारी श्री विष्णु द. गिते)<br>न्यायनिर्णयाचा दिनांक १८/०७/२०२६<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१४५/२०२१** |
| | अपराध क्रमांक : १९८/२०२१<br>पोलीस स्टेशन : वडवणी, ता. वडवणी, जि. बीड. |
| फिर्यादी | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन वडवणी, ता. वडवणी, जि. बीड. |
| फिर्यादीतर्फे वकिल | श्री ए. डी. साखरे, सहाय्यक सरकारी वकिल. |
| आरोपी | दिगांबर भागवत नागवे,<br>वय २३ वर्षे, राहणारः बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड. |
| आरोपीतर्फे वकिल | श्री. के. डी. काळे. |

**[फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २६.०९.२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | २६.०९.२०२१ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०६.११.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०८.११.२०२२ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | १६.०२.२०२३ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १८.०७.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

आरोपीची सविस्तर माहिती.

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिगांबर नागवे | २६.०९.२०२१ रोजी नोटीस | -- | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये | निर्दोष सुटका १८.०७.२०२६ | -- | -- |

<u>सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी</u>.

अ. सरकारी साक्षीदारः-

| **दर्जा** | **साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | अशोक नवनाथ आघाव (नि.क्र.११ लगत) | साक्षीदार |
| सा.क्र.२ | अन्शीराम साऊजी कपाले (नि.क्र.११ लगत) | साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

<u>सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी</u>.

अ. सरकार पक्षातर्फेः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः–

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **दस्तऐवजाचे वर्णन.** |
|---|---|---|
| ०१ | ११ | दोषारोप |
| ०२ | २२ | आरोपीचे सी.आर.पी.सी कलम ३१३ नुसार दिवेदन |

ड. जप्त वस्तुंचे वर्णनः–

| अनुक्रमांक | वस्तूंचा नंबर | वस्तूचे वर्णन |
|---|---|---|
| ०१ | -- | देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या, ज्यांची एकूण किंमत रु.२१००/-. |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक १८/०७/२०२६)

**१.** आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये खटला पोलीस स्टेशन, वडवणी तर्फे दाखल करण्यात आला.

**२.** फिर्यादमध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, दिनांक २६.०९.२०२१ रोजी १८.४५ वाजताचे सुमारास वडवणी तालुका हद्दीतील बीड-परळी महामार्गावरील हॉटेल रियामध्ये दिगांबर भागवत नागवे (आरोपी) देशी दारुची चोरटी विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार फिर्यादी यांनी पंचांसह हाटेल रिया येथे जाऊन झडती घेतली असता त्यांना आरोपीच्या ताब्यातुन देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या, ज्यांची एकूण किंमत रु.२१००/- बिनापरवाना बाळगलेल्या व विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात मिळून आल्या. जप्त मुद्देमालातून नमुना काढून रासायनिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आणि उर्वरित मुद्देमाल जप्त करुन त्यांचा पंचनामा करण्यात आला. त्यामुळे, आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. माझे पुर्वीचे सन्माननीय पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी क्र.११ खाली महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोप निश्चित केले.

**३.** आरोपीला तिचे विरुध्द नोंदविण्यात आलेला संपरीक्षा अभिलेख मराठीतुन समजावुन सांगण्यात आला असता तिने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे आरोपी विरुध्द खटला चालविण्यात आला. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून

आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचा जबाब (नि.क्र.२२) नोंदविण्यात आला.

**४.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्री ए. डी. साखरे आणि आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. के. डी. काळे यांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** सदर खटल्यातील संपूर्ण पुरावा व कागदपत्रे पाहून खालीलप्रमाणे मुद्दे निर्धारीत केले व त्यास मी खालील नमुद कारणास्तव समोर दर्शविलेल्या निष्कर्षा प्रत पोहोचलो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष हे शाबीत करतात काय की, दिनांक २६.०९.२०२१ रोजी १८.४५ वाजताचे दरम्यान वडवणी तालुका हद्दीतील बीड–परळी महामार्गावरील हॉटेल रियामध्ये आरोपीच्या ताब्यात देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या हा मुद्देमाल मिळून आला आणि त्या अन्वये आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम ६५(ई) नुसार दंडनीय अपराध केला आहे ? | **नाही.** |
| **२.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**६.** आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने स्वतःच्या बचाव कामी कोणतेही साक्षीदार तपासले नाहीत.

**<u>मुद्दा क्रमांक १ करीताः</u>–**

**७.** अशोक आघाव (सा.क्र.१)(नि.क्र.११ लगत) हे सदर प्रकाणातील प्रत्यक्षदर्शी आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दिनांक २६.०९.२०२१ रोजी साक्षीदार स्वतः व इतर पोलीस कर्मचारी असे सर्वजण वडवणी शहरामध्ये पेट्रोलिंग करीत असताना

शिवाजी चौक येथे पोलीस शिपाई श्री.काकडे यांना गुप्त बातमीदारामार्फत इसम नामे दिगांबर भागवत नागवे हा त्याचे रिया हॉटेलमध्ये विनापरवाना व बेकायदेशीररीत्या देशी दारुची चोरटी विक्री करित असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी दोन पंचांसहित हॉटेल रिया मध्ये १८.४५ वाजता छापा टाकला असता त्यांना पाहून दारु पिणारे लोक पळून गेले. त्यावेळी, हॉटेलमध्ये दारू विक्री करणारा इसम दिगांबर भागवत नागवे हा जागीच मिळून आला. सदर इसमाच्या ताब्यातील पांढ–या रंगाच्या पिशवीची पंचांसमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारू टँगो पंच कंपनीच्या १८० मिली. मापाच्या ३५ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. त्यानुसार पंचांसमक्ष त्यातील एक बाटली सी. ए. तपासणीकरीता वेगळी काढण्यात आली आणि पंचनामा तयार केल्यानंतर पोलीस शिपाई श्री.काकडे यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली.

८. अन्शीराम कापले (सा.क्र.२)(नि.क्र.११ लगत) यांनी प्रकरणातील मुद्देमाल हा सी. ए. चाचणीसाठी वैद्यकीय प्रयोगशाळा औरंगाबाद येथे जमा केला आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दिनांक ०५.१०.२०२१ रोजी सहा. पोलीस निरीक्षक श्री.जायभाये यांनी सदर प्रकरणातील गु.र.नं.१९८/२०२१ मधील देशी दारू टँगो पंच कंपनीची १८० मि.ली. मापाची नमुन्याची एक सिलबंद बाटली औरंगाबाद येथील न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा करणेसाठी त्यांच्याकडे पत्रासह दिली होती. त्यानुसार साक्षीदार यांनी दिनांक ०६.१०.२०२१ रोजी नमुन्याची बाटली न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा केली आहे.

९. सा.क्र.१ श्री आघाव यांच्या कथनाप्रमाणे सदर प्रकरणातील जप्ती पंचनामा एएसआय श्री जायभाये यांनी तयार केलेला आहे, परंतु एएसआय जायभाये यांना साक्षी समन्स तसेच वॉरंट बजावणी करुनही ते न्यायालयासमोर हजर झालेले नसल्यामुळे त्यांचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदर प्रकरणातील जप्ती पंचांची साक्ष नोंदविण्यास अभियोग पक्षास यश आलेले नाही.

१०. सा.क्र.२ श्री कापले यांनी सदर प्रकरणातील मुद्देमाल औरंगाबाद येथील प्रयोगशाळेत दाखल केलेला असून त्याची पावती आणि रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे. यावरुन हे दिसून येत आहे की, सदर साक्षीदाराने मुद्देमाल

प्रयोग शाळेत जमा केला आहे आणि त्या अनुषंगाने रासायनिक परिक्षण अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे, परंतु आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला आरोपीच्या ताब्यात मिळून आलेल्या देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या दारु असल्याचे सिध्द होणे जरुरी आहे. रासायनिक परिक्षण अहवाल निशाणी क्र.३ वरील पत्रासोबत अभिलेखावर दाखल केलेला असला तरी जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे ही बाब सिद्ध झालेली नाही. फिर्यादी तसेच जप्ती पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यास अभियोग पक्ष सफल झालेला नाही.

**११.** या ठिकाणी मला असे नमदु करावेसे वाटते की, रासायनिक विष्लेशण अहवाल जरी अभिलेखावर दाखल केला असला तरी जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेला आहे ही बाब सिद्ध करणे आवश्यक आहे. जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुनच जप्त केलेला आहे ही बाब सिद्ध करणेसाठी जप्ती पंच यांची साक्ष अभिलेखावर येणे आवश्यक होते. सबब, आरोपी हा देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या दारु निषीध्द मद्य बाळगताना मिळून आला हे शाबीत होत नाही. करीता मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीताः–**

**१२.** सदर प्रकरणातील फिर्यादी तसेच इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला असल्याने फिर्याद तसेच जप्ती पंचनामा सिद्ध झालेला नाही. त्यामुळे, जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुनच जप्त केलेला आहे ही बाब अभियोग पक्षाने सबळ पुरावा देवून सिध्द केलेली नसल्यामुळे अभिलेखावर असलेला पुरावा हा आरोपी विरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. सबब, मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी **दिगांबर भागवत नागवे** यांस फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे व आरोपीच्या जमनातदारास मुक्त करण्यात येत आहे.

३) जप्त मुद्देमाल देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. च्या ३५ बाटल्या, ज्यांची एकुण किंमत रु.२१००/– महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ९८ प्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी अपील कालावधीनंतर योग्य त्या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. तसेच इतर काही मुद्देमाल असल्यास अपील कालावधीनंतर त्याचा नियमाप्रमाणे विल्हेवाट करण्यात यावी.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी रु.७,५००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.07.18 17:05:48 +0530

**दिनांक – १८/०७/२०२६.**

**( विष्णु द. गिते )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडवणी,**
**जि. बीड.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी -१, वडवणी. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :- | १८/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १८/०७/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १८/०७/२०२६ |